# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.गौतमनगर
# पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव जि. अहमदनगर

जा.क्र./ऊस विकास/३४२० दि.२१/०१/२०२०

## - परिपत्रक -

### लागवड हंगाम २०१९-२० (गळीत हंगाम २०२०-२१) करिता
### सुरु ऊस लागवड धोरण

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व 'क' वर्ग सभासदांना कळविण्यात येते की,कारखान्याचे लागवड हंगाम २०१९-२० (गाळप हंगाम २०२०-२१) करीता कारखाना कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता व्हावी या हेतूने ऊस उत्पादकांनी सुरु ऊस लागवडी कराव्यात त्यासाठी कारखान्याच्या मा. संचालक मंडळाने खालीलप्रमाणे धोरण घेतलेले आहे.

**१) ऊस लागवड कालावधी व ऊस जाती-**

| अ.नं | पिक प्रकार | हंगाम कालावधी | शिफारशीत ऊस जाती |
|---|---|---|---|
| १ | सुरु | १ जानेवारी २०२० ते ३० एप्रिल २०२० | को८६०३२,कोएम-०२६५,एमएस-१०००१, कोव्हीएसआय-०३१०२,व्हीएसआय-०८००५ |

**२)सुरु ऊस लागवड व जोपासणी कामी इतर सोई सवलती खालील प्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या आहेत.**

| अ.न | योजनेचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १ | ऊस लागवड ॲडव्हान्स रक्कम (उचल) | सुरु ऊस लागवड खर्चाकरीता प्रती एकरी रू.३,०००/- मात्र ॲडव्हान्स (उचल) म्हणून आदा करणेत येईल .सदर उचल रक्कम ऊस क्षेत्राची नोंदणी झाल्यानंतर व शेतकी स्टाफने पाहणी व मोजणी केल्यानंतर आदा केली जाईल. |
| २ | ऊस बेणे | कारखाना हमीवर प्रती एकरी रू.१००००/- रक्कमेपर्यतचे ऊस बेणे उधारीने उपलब्ध करून देण्यात येईल.ऊस बेण्याचा खरेदी विक्री दर सभासदांनी आपआपसात ठरवावयाचा आहे.परंतू कारखान्याची बेणे विक्री चिठ्ठी असल्याशिवाय परस्पर बेणे विक्री करू नये. |
| ३ | ऊस रोपापासुन ऊस लागवड योजना | ऊस रोपापासुन ऊस लागवड योजना धोरणाप्रमाणे राबविण्यात येईल ज्या शेतकऱ्यांना स्वत:रोपे तयार करावयाची असतील त्यांना अर्धा गुंठा ऊस बेणे व पॉली ट्रे चा उधारीने पुरवठा करणेत येईल. |
| ४ | रासायनिक खते | सुरु ऊस लागवड पिकास प्रती एकरी २ गोणी युरीया व २ गोणी इफको १०:२६:२६ अथवा तत्सम खते रू.३०००/-रक्कमेपर्यत उधारीने उपलब्धतेनुसार पुरविण्यात येतील. |
| ५ | गंधक | दुय्यम अन्नद्रव्य म्हणून गंधक (सल्फर) एकरी १० किलो या प्रमाणात उधारीने उपलब्धतेनुसार पुरविण्यात येईल. |
| ६ | सुक्ष्मअन्नद्रव्ये,सल्फेट ऑफ पोटॅश व द्रवरूप जैविक खते,किड नियंत्रके | ज्या ऊस उत्पांदकाना ऊस पिकावर सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते (मल्टीमायक्रोन्युट्रीयंट) व सल्फेट ऑफ पोटॅश (००:००:५०) व द्रवरुप जैविक खत(प्लांट हेल्थ ,सॉईल हेल्थ व किड नियंत्रके) यांची फवारणी करावयाची आहे त्यांना कारखाना धोरणाप्रमाणे ते उधारीने उपलब्ध असेपर्यत पुरविण्यात येईल. |

मागील पानावर/-



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ७ | **तणनाशके-** | ऊस पिकातील तण नियत्रणांकरीता कारखान्यामार्फत मेट्रीब्युझीन ७०% WP चा उधारीने पुरवठा करण्यात येईल. |
| ८ | **ठिबक सिंचना खालील ऊस पिकास विद्राव्य खतांचा उधारीने पुरवठा** | ठिबक सिंचन संच बसवुन जे सभासद ऊस पिक जोपासतील त्यांना इफको (१७:४४:००) व इफको (१८:१८:१८) किंवा तत्सम विद्राव्य खते प्रत्येकी प्रति एकरी २५ किलो उधारीने देण्यात येईल.परंतु ज्यांनी रासायनिक खते घेतली असतील त्यांना विद्राव्य खते दिली जाणार नाही. |

**३) इतर शर्ती व अटी -**

**अ)** रासायनिक खते,तणनाशके ,सुक्ष्मअन्नद्रव्ये व जैविक द्रवरूप खते इत्यादी वस्तुरूप सहाय्याची त्याचप्रमाणे उचल (अॅडव्हांन्स) रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज ऊस उत्पादकांचे ऊस बिलातून करण्यात येईल.

**ब)** सुरु पिकाची कारखान्याकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.याशिवाय एकत्रित कुटुंबातील संपुर्ण ऊस क्षेत्राची नोंद कारखान्याकडे करणे आवश्यक राहिल. सुरु पिकास वरीलप्रमाणे अर्थसहाय्य व वस्तुरूप सहाय्य हे संबधीत शेतक-याकडे पुर्वी असलेली कारखाना येणे बाकी विचारात घेऊन देण्यात येईल.

**क)** वरील नियम व अटी हया प्राथमिक स्वरुपाच्या असुन त्यामध्ये वाढ अथवा सुधारणा करण्याचा अधिकार कारखान्याने राखुन ठेवलेला आहे.

**ड)** कारखान्यामार्फत वस्तुरूप सहाय्य इ.घेतेवेळी आधारकार्ड व ओळखपत्र /अधिकारपत्र दाखविणे आवश्यक राहिल.

तरी सर्व ऊस उत्पादकांना विनंती करण्यात येते की,गळीत हंगाम २०२०-२१ चे गळीतासाठी जास्तीत जास्त सुरु ऊस लागवडी कराव्यात व कार्यक्षेत्रातून ऊस उपलब्धता वाढविण्या करीता सहकार्य करावे ही विनंती.

**कळावे,**

**आपला विश्वासु**
**गि.ज.जगताप**
**कार्यकारी संचालक**



Scanned by CamScanner